# एमपीएससीची तयारी करणाऱ्या तरुणाची लग्नपत्रिका व्हायरल

**मुंबई–** सध्या चर्चा आहे ती म्हणजे एका व्हायरल लग्नपत्रिकेची. ही लग्नपत्रिका पाहून कुणालाही हसू आल्याशिवाय राहणार नाही. अनेकजण या पोस्टवर भन्नाट कमेंट्सही करताना दिसत आहेत. सध्या ही लग्नपत्रिका बरीच चर्चेत आली आहे ती म्हणजे या लग्नपत्रिकेवरील मजकूरावरून. पाहुयात नक्की या लग्नपत्रिकेत असं काय लिहिलंय की नेटकऱ्यांनीही आपलं हसू आवरणं हे कठीण झालं आहे.




तुम्ही या पत्रिकेत पाहू शकता, चि. अमोल (MPSC Preparation) असं लिहलं आहे. अजून अधिकारी झाला नाही मात्र परीक्षेचा अभ्यास करतोय असं लिसेलं आहे. ही पत्रिका वाचून सर्वांनाच हसू आलंय. यावेळी याचा व्हिडीओ हा इन्स्टाग्रामवर व्हायरल झाला आहे. लग्नाचे निमंत्रण देण्यासाठी आकर्षक निमंत्रण पत्रिका देण्याकडे आयडिया अनेकजण करताना दिसतात. निमंत्रण पत्रिकेत काहीतरी हटके असावे म्हणजे पाहुणे मंडळीही आश्चर्यचकित होतील अशी प्रत्येकाची इच्छा असते. सोशल मीडियावर असे व्हिडीओही अनेकदा व्हायरल होताना दिसतात. त्यातून याचे ट्रेंड्सही येतात. पर्यावरणपूरक लग्नपत्रिका, हस्तलिखित टाइ'प किंवा अगदी जुन्या पद्धतीने चिठ्ठी लिहिल्यासारख्या पत्रिका असतात. अनेक जणं हे सेवा परीक्षांची तयारी करत असतात. अनेकांना त्यासाठी बराच वेळही लागतो. पत्रिकेतही नवरदेवाच्या नावाच्या बाजूला त्याच्या पदवीचा, नोकरीचा उल्लेख केला जातो अशा लग्नपत्रिका अनेकदा व्हायरल होत असतात. अशाच एका स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या तरुणाच्या लग्नाची पत्रिका सोशल मीडियावर व्हायरल झाली आणि चर्चांना उधाण आले. ही लग्नपत्रिका पाहून काहीजण आश्चर्यचकित झाले होते. सोशल मीडियाच्या वेगवेगळ्या प्लॅटफॉर्मवरही या लग्नपत्रिकेची खूप चर्चा होत आहे. या अनोख्या लग्नाचे कार्ड सोशल मीडिया प्लॅटफॉर्म इन्स्टाग्रामवर gavthišshešb हे नावाच्या आयडीसह शेअर करण्यात आले आहे. नेटकरीही या व्हिडीओखाली प्रचंड प्रतिक्रिया देताना दिसत आहेत. लग्नपत्रिकेतील मजकूर हा फारच क्रिएटिव्ही वापरून केला जातो. त्यातूनही आजकाल अशा लग्नपत्रिका या बऱ्याच चर्चेत असतात. त्यातून आता ही लग्नपत्रिका व्हायरल झाल्याने सर्वत्र चर्चा रंगलेल्या आहेत.

## पाकचा राष्ट्रध्वज जाळून व बंद पाळून

# पहलगाम घटनेचा कुकाण्यात निषेध

**नेवासा (तालुकाप्रतिनिधी) –** तालुक्यातील कुकाणा येथे ग्रामस्थांच्यावतीने निषेध सभा घेऊन काश्मीर मधील पहलगाम येथील हिंदू पर्यटकांवरील अतिरेकी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर कडकडीत बंद पाळण्यात आला. तसेच पाकिस्तानचा राष्ट्रध्वज जाळून निषेध व्यक्त केला.





२२ एप्रिल रोजी जम्मू काश्मीरमध्ये पहलगाम येथील बैसरण घासवाटा परिसरात दहशतवाद्यांनी भारतीय पर्यटकांना त्यांचा धर्म विचारून निर्दयपणे गोळीबार केला. यात २८ निष्पाप पर्यटकांचा मृत्यू झाला, तर अनेक जण गंभीर जखमी आहेत. ही घटना दहशतवाद्यांनी केलेली क्रूर घटना म्हणावी लागेल. भारताच्या सार्वभौमत्वावर आणि हिंदूंवर तसेच एका मुस्लिम देखील फायरिंग करण्यात आली.

काश्मीर घटनेचा कुकाणा बसस्थानक परिसरात निषेध करण्यात आला. यावेळी सोमनाथ कचरे, जवाहर भंडारी, बाळासाहेब कचरे,राष्ट्रवादीचे अब्दुल शेख, काँग्रेसचे अभिजीत लुणिया, अजिंक्य निकम, शिवाजी कावरे यांनी तीव्र शब्दात भावना व्यक्त करत हल्ल्याचा निषेध केला.

निष्पाप नागरिकांना क्रूरपणे मारणाऱ्या दहशतवाद्यांवर सरकारकडे कडक कारवाई करण्याची मागणी केली. यावेळी 'भारत माता की जय', 'वंदेमातरम'च्या घोषणा देण्यात आल्या. पाक विरोधात घोषणा देवून पाकिस्तानचा ध्वज जाळून निषेध व्यक्त केला. मृत पावलेल्या पर्यटकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी माजी सरपंच दौलत देशमुख, भाऊसाहेब फोलाणे, श्रीधर कासार, राजेंद्र बागडे, वसंतराव गरड, सुभाष चौधरी, विष्णू फासे, राजेंद्र वर्मा,सुनिल पंडित, अर्जुन लोंढे, भारत गरड, सतिष कावरे, मुसा इनामदार, बाबासाहेब उंडे, जावेद शेख, वैभव चेमटे, राजेंद्र देडगावकर, राजेंद्र निकम, ईकलाख शहा यांचेसह युवक, व्यापारी, ग्रामस्थ उपस्थित होते. पोलीस उपनिरीक्षक शैलेंद्र ससाणे, पो.कॉ वाल्मिक वाघ यांचे मार्गदर्शनात पोलीस कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला.

# नगर मार्गावरील वाहतूक कोंडी कायमची सुटणार

**पुणे–** अहिल्यानगर, पुणेकरांसाठी अतिशय महत्त्वाची बातमी आहे. नगर मार्गावरील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी महानगरपालिकेच्या हद्दीतील फिनिक्स मॉल ते खराडीदरम्यान दुमजली उड्डाणपूल बांधण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडवण्यासाठी गेल्या काही वर्षांपासून सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. यासाठी पुणे ते शिरूर दरम्यान ५६ किलोमीटर लांबीचा उन्नत मार्ग विकसित केला जात आहे. या प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. या मार्गामुळे नगर रस्त्यावरील वाहतूक कोंडी १००% कमी होण्याची अपेक्षा असून या प्रकल्पासाठी ७,५०० कोटी रुपये खर्चाचा अंदाज आहे.

या उन्नत महामार्गातून फिनिक्स मॉल ते खराडी बायपास हा चार किलोमीटर लांबीचा मार्ग वगळण्यात आला होता. यामुळे या भागातील नागरिकांमध्ये असंतोष व्यक्त करण्यात येत होता. अखेर नगर मार्गावरील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी महानगरपालिकेच्या हद्दीतील फिनिक्स मॉल ते खराडीदरम्यान दुमजली उड्डाणपूल बांधण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. याबाबतचे आदेश राज्य शासनाने जारी केले आहेत.

या उड्डाणपुलासाठी स्थानिकांनी मागणी लावून धरली होती आणि त्यासाठी सतत पाठपुरावा देखीलकेला. स्थानिकांनी फिनिक्स मॉल ते खराडी मार्ग उन्नत महामार्गात समाविष्ट करण्याची मागणी करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन दिले होते. तसेच महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनीही एमएसआयडीसीच्या मुख्य अभियंत्यांना यासंदर्भात पत्र लिहून सूचना दिल्या होत्या. त्यानंतर आता फिनिक्स मॉल ते खराडीदरम्यान दुमजली उड्डाणपूल बांधण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे फिनिक्स मॉल चौकातील वाहतूक कोंडी कमी होण्याची शक्यता आहे. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे पुणे ते शिरूर उन्नत मार्गात आता फिनिक्स मॉल ते खराडी या टप्प्याचा देखील समावेश करण्यात आला आहे. या ४ किलोमीटर मार्गावर दुमजली उड्डाणपूल बांधला जाणार असून यामुळे वाहतूक कोंडी कमी होईल अशी आशा आहे. वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून उन्नत महामार्ग (एलिव्हेटेड) मार्ग उभारण्यासाठी शासनाने परवानगी दिली आहे.

हा मार्ग सुरुवातीला राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण मार्फत विकसित होणार होता. मात्र, रस्त्यांची कामे जलद गतीने व्हावीत यासाठी गेल्या वर्षी चडखऊ ची (महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास महामंडळ) स्थापना करण्यात आली. या प्राधिकरणाकडेच आता हे काम सोपवण्यात आले आहे. आता त्यात फिनिक्स मॉल ते खराडी टप्प्याचा देखील समावेश करण्यात आला आहे.

पुणे ते शिरूर आणि अहमदनगर ते देवगड या महामार्गाचे आधुनिकीकरण पूर्ण झाल्यावर २००८ च्या पथकर धोरणानुसार वाहनांवर पथकर आकारणी होईल, असे सरकारने स्पष्ट केले आहे. या उड्डाणपुलामुळे नगर रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी होऊन पुणेकरांना दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. यामुळे स्थानिक नागरिकांनी शासनाच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे.

# बुमराहची कमाल, लखनौची दाणादाण

## मुंबईचा ५४ धावांनी दणदणीत विजय

**मुंबई–** आयपीएलच्या मैदानात काल मुंबई इंडियन्स आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यात सुपर संडेचा पहिला सामना खेळला गेला. या सामन्यात मुंबई इंडियन्सने दणदणीत विजय मिळवत लखनौला जोर का झटका दिला. मुंबईने दिलेल्या २१६ धावांच्या आव्हांनाचा पाठलाग करताना लखनौचा डाव अवघ्या १६१ धावांवर गडगडला. मुंबईचा गोलंदाज जसप्रीत बुमराहने एकाच ओव्हरमध्ये तीन विकेट्स घेत लखनौचे कंबरडे मोडले.



मुंबई इंडियन्सने दिलेल्या २१६ धावांचे आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या लखनौची सुरुवात खराब झाली. लखनौला निकोलस पुरनच्या रुपाने पहिला धक्का बसला. निकोलस पूरननंतर कर्णधार ऋषभ पंतही आऊट झाला आहे. त्याला विल जॅक्सने आऊट केले. सलामीचे फलंदाज बाद होताच जसप्रीत बुमराहने लखनौला मोठा धक्का दिला. जसप्रीत बुमराहने एकाच षटकात तीन विकेट्स घेतल्या. प्रथम त्याने डेव्हिड मिलरला २४ धावांवर बाद केले. यानंतर अब्दुल समदला दोन धावांवर आणि आवेश खानला ० धावांवर पॅव्हेलियनमध्ये पाठवण्यात आले.

सामन्यात नाणेफेक गमावल्यानंतर मुंबईने प्रथम फलंदाजी केली. रायन रिकेल्टन आणि रोहित शर्मा यांनी वादळी सुरुवात केली आणि अवघ्या ३ ओव्हरमध्ये ३० धावा केल्या. रोहित शर्माने पहिल्या दोन चेंडूवर सिक्स मारून सुरुवात केली पण त्यानंतर त्याने आपली विकेट गमावली. मयंक यादवच्या चेंडूवर प्रिन्सने त्याचा झेल टिपला. त्यानंतर रायन रिकेल्टनने डाव सावरत २५ बॉलमध्ये ५चौकार आणि ४ षटकार मारत अर्धशतक पूर्ण केले. तो ३२ चेंडूत ५८ धावा काढल्यानंतर दिग्वेश राठीचा बळी ठरला. प्रिन्स यादवने २९ धावांवर विल जॅक्सला बाद करून लखनौ संघाला मोठे यश मिळवून दिले. लखनौ संघाला जास्त त्रास न देता रवी बिश्नोईच्या गोलंदाजीवर तिलक वर्मा अवघ्या ६ धावांवर बाद झाला. सूर्यकुमार यादवने २७ चेंडूत अर्धशतक ठोकले.

# चुकीचा स्पर्श केला.. रीलस्टार मानसीने तरुणाच्या थेट थोबाडीत मारली

**कोल्हापूर–** गेल्या काही दिवसांपासून महिलांवरील अत्याचाराच्या, छेडछाडीच्या घटना वारंवार घडत आहेत. बसमध्ये, रेल्वे प्रवासादरम्यान तसेच सार्वजनिक ठिकाणीही महिलांच्या विनयभंगाचे प्रकार घडत आहेत, ज्यामुळे महिला सुरक्षेवरुन प्रश्न उपस्थित होत आहे. अशातच एका मराठमोळ्या इन्फ्लूएन्सरसोबत एक धक्कादायक प्रकार घडला असून त्याचा व्हिडिओही सोशल मीडियावर सध्या व्हायरल होत आहे.

मानसी सुरवसे ही कोल्हापूरची प्रसिद्ध रीलस्टार तसेच सोशल मीडिया इन्फ्लूएन्सर आहे. तिचे इन्स्टाग्रामवर जवळपास १० लाख फॉलोअर्स असून सोशल मीडियावर ती प्रचंड लोकप्रिय आहे. तिचे व्हिडिओ, रील्स तुफान व्हायरल होत असतात. सध्या मानसीने शेअर केलेल्या एका धक्कादायक व्हिडिओने सर्वांचे लक्ष वेधले आहे.

या व्हिडिओमध्ये एका तरुणाने तिला चुकीचा स्पर्श केला ज्यानंतर या इन्फ्लूएन्सरने तिथेच त्याच्या थोबाडीत मारली. एवढ्यावर न थांबता तिने त्या मुलाच्या घरी जाऊनही कुटुंबियांसमोर सज्जड दम दिला. हा सगळा प्रकार कॅमेऱ्यात कैद झाला असून नेटकऱ्यांनी त्यावर जोरदार प्रतिक्रिया दिल्यात. दुसरीकडे काही जण हा सर्व प्रसिद्धीसाठी केलेला स्टंट केल्याचेही म्हटले आहे.

# राहाता बाजार समितीत कांदा १४०० रुपये क्विंटल

**राहाता (तालुका प्रतिनिधी)–** राहता बाजार समितीत रविवारी कांद्याला जास्तीत जास्त १४०० रुपये भाव मिळाला. रविवारी राहाता बाजार समितीत कांद्याच्या ३६९१ गोण्यांची आवक झाली.

कांदा नंबर एक ला ११०० ते १४०० रुपये भाव मिळाला. कांदा नंबर दोन ला ७०० ते १ हजार ५० रुपये भाव मिळाला. कांदा नंबर ३ ला ४०० ते ६५० रुपये भाव मिळाला. गोल्टी कांद्याला ६०० ते ९०० रुपये भाव मिळाला. रोड कांद्याला २०० ते ४०० रुपये भाव मिळाला. डाळिंबाच्या ३५२ क्रेटसची आवक झाली. डाळिंब नंबर एक ला ७६ ते १२५ रुपये प्रतिकिलोला भाव मिळाला. डाळिंब नंबर दोन ला ५१ ते ७५ रुपये भाव मिळाला. डाळिंब नंबर ३ ला २६ ते ५० रुपये भाव मिळाला. डाळिंब नंबर चार ला ५ ते २५ रुपये भाव मिळाला.

पान १ वरुन

## अहिल्यानगरमध्ये ६२ लाखांचा बनावट बासमती तांदूळ हस्तगत

मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी राजेश बडे, नमुना सहाय्यक सागर शेवंते व शुभम भस्मे यांनी केली. या प्रकरणाचा तपास अन्न सुरक्षा अधिकारी बडे करीत आहेत.

**नागरिकांच्या जीवाशी खेळ**

संबंधित इंडस्ट्रीच्या मालकाचे अहिल्यानगर शहरातील दाळमंडई परिसरातही दुकान असल्याचे निष्पन्न झाले आहे. या दुकानातून बनावट बासमती तांदळाची विक्री केली जात असल्याचा संशय असून, यासंबंधीही चौकशी सुरू आहे. दरम्यान, अन्न व औषध प्रशासनाच्या या कारवाईमुळे नागरिकांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या भेसळीच्या धंद्यावर आळा बसला आहे.

## भारताचा 'वॉटर बॉम्ब'

परिसरात त्याने मोठा हाहाःकार उडवला. त्यानंतर पुराने पाकिस्तानमधील अनेक भागांना व्यापले.

**सिंधू पाणी करार रद्द करण्याची अधिसूचना**

दरम्यान, भारताने पाकिस्तानला सिंधू पाणी करार रद्द करण्याची अधिकृत माहिती दिली आहे. याविषयीची औपचारिक अधिसूचना पाकिस्तानला देण्यात आली आहे. गुरुवारी याविषयीचे कागदपत्रे पाकिस्तानला सोपवण्यात आली. पाणी पातळी, पाण्याचा एकूण साठा, पाणी सोडण्याबाबतच्या सूचना, नवीन जलयोजना, त्यासंबंधीच्या बैठका, आकडेवारी वा पाण्याविषयीची कोणतीही माहिती देण्याबाबतचे सर्व नियम, हरकती रद्द करण्यात आल्या आहेत. आता हा करार रद्द केल्याने भारताला नवीन जलयोजना राबवण्यासाठी पाकिस्तानची अनुमती घेण्याची गरज नाही. दरम्यान पाकिस्तानच्या लष्कराने गेल्या दोन दिवसांपासून नियंत्रण रेषेवर आगळीक केली आहे. या भागात सातत्याने गोळीबार करण्यात येत आहे. तर पाकिस्तान नियंत्रण रेषेजवळ हालचाली वाढल्या आहेत. सीमेवर रणगाडे तैनात करण्यात येत आहे.

## काविळमुळे राजूरमध्ये तरुणीचा मृत्यू

यामुळे आरोग्य विभागाने घरोघरी जाऊन नागरिकांची तपासणी सुरू केली असून, संशयित रुग्णांना त्वरीत उपचारासाठी दवाखान्यात दाखल केले जात आहे. गावात घरोघरी मेडिक्लोर (पाणी निर्जंतुकीकरणासाठीचे रसायन) वाटप करण्यात येत आहे आणि पिण्याच्या पाण्याची स्वच्छता राखण्याच्या सूचना दिल्या जात आहेत. ग्रामपंचायतीनेही परिस्थितीच्या गांभीर्याची जाणीव ठेवत स्वच्छता मोहीम राबवली आहे. सार्वजनिक पाणीटाक्या आणि विहिरी यांचे निर्जंतुकीकरण सुरू असून, पाणीपुरवठा यंत्रणांची तपासणी केली जात आहे. फक्त उकळलेले किंवा स्वच्छ फिल्टर केलेले पाणीच वापरावे. स्वच्छतेची विशेष काळजी घ्यावी. काविळची लक्षणे आढळल्यास तातडीने आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

## 'स्थानिक स्वराज्य' मध्ये काळानुरूप महाविकास आघाडीचा निर्णय

उत्तर दिले जात नाही. पंतप्रधानांनी तेथे जाणे आवश्यक होते. परंतु, ते परदेश दौऱ्यावरून आल्यानंतर लगेच बिहार निवडणुकीच्या प्रचारासाठी बिहार दौऱ्यावर गेले. या हल्ल्याच्या वेळेस तेथील मुस्लिम बांधवांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता पर्यटकांचे प्राण वाचविले. राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडविले. हे तेथील पर्यटकांनी पुन्हा परतल्यावर अनुभव सांगितले आहेत. काँग्रेस पक्षाचे संघटन वाढविले जाणार आहे. निवडणुकीच्या परिणामानंतर काही कार्यकर्ते पक्षातून गेले असतील. परंतु, युती सरकारबद्दल जनतेच्या मनात भ्रमनिराश झालेला आहे. पक्षाच्या कार्यकर्त्यांची बैठक घेऊन, त्यांच्याशी विचार-विनिमय करून रिक्त जागा भरल्या जातील. ही प्रक्रिया राज्यात सुरू करण्यात आली आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, महानगरपालिका आदी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दोन वर्षांपासून झालेल्या नाहीत. या आगामी काळात या निवडणुका होतील. त्यावेळेस काळानुरूप परिस्थितीनुसार महाविकास आघाडीने एकत्रित निवडणुका लढवायच्या किंवा स्वतंत्र लढवायच्या याचा निर्णय घेतला जाईल, असे थोरात यांनी यावेळी स्पष्ट केले. जिल्हाध्यक्ष जयंत वाघ म्हणाले, अहिल्यानगर शहर जिल्हाध्यक्षांसह विविध रिक्त पदांसाठी मुलाखती घेतल्या जाणार आहेत. जिल्ह्याच्या ठिकाणी संविधान बचाव मोर्चा काढला जाणार आहे. सर्व सामान्य जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी पक्ष लोकशाही मार्गाने आंदोलने, मोर्चाचे आयोजन करणार आहे.

## यंदापासून अकरावीचे प्रवेश ऑनलाईन

वतीने शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांची नोंदणी सुरू करण्यात आली आहे. पुढील आठवड्यात ही नोंदणी पूर्ण होणार आहे.

शालेय शिक्षण विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला आहे. सद्यस्थितीत मुंबई महानगर क्षेत्र (एमएमआरडीए), पुणे-पिंपरी-चिंचवड, अमरावती, नागपूर आणि नाशिक या महानगरपालिका क्षेत्रांत ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येत होती. मात्र, आता विद्यार्थी, पालकांचा वेळ, पैसा आणि श्रम यांचा अपव्यय टाळण्यासाठी अकरावीची केंद्रीय ऑनलाईन प्रवेश पद्धती राज्यभर राबवण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. संपूर्ण प्रवेश प्रक्रियेची अंमलबजावणी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक स्तरावरून करण्यात येणार असून, शिक्षण आयुक्तांचे प्रवेश प्रक्रियेवर नियंत्रण राहणार आहे.

मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, नाशिक, औरंगाबाद, लातूर, कोल्हापूर विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्याकडून उच्च माध्यमिक शाळा-कनिष्ठ महाविद्यालयांकडून नोंदणी अर्जामध्ये नमूद केलेली माहिती (उदाहरणार्थ शाखानिहाय तुकड्या, अनुदानित, विनाअनुदानित, स्वयंअर्थसहायित, वर्गनिहाय व शाखानिहाय विद्यार्थी प्रवेश क्षमता, कनिष्ठ महाविद्यालयात उपलब्ध असलेले विषय) तपासून माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक यांनी निश्चित केलेल्या ऑनलाईन सेवा पुरवठादारास ठरलेल्या कालावधीत उपलब्ध करून करून देणार आहेत. या ऑनलाईन प्रवेश पद्धतीविषयी विद्यार्थी आणि पालकांना माहिती उपलब्ध करून द्यावी, असे आदेश शिक्षण विभागाकडून माध्यमिक शिक्षण विभागाला काढण्यात आले आहेत. .

दरम्यान, माध्यमिक शिक्षक विभागाच्या वतीने यासाठी तयारी सुरू केली असून जिल्ह्यातील महाविद्यालय आणि कनिष्ठ विद्यालयाची नोंदणी सुरू करण्यात आली आहे. ही प्रक्रिया यशस्वीपणे राबवण्यासाठी सहाय्यक शिक्षण उपसंचालक यांनी दोन वेळेस ऑनलाईन बैठका घेतलेल्या असून नगर जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी व क्षेत्रीय अधिकारी यांना माध्यमिक शिक्षक विभागाच्या वतीने मार्गदर्शक सूचना देण्यात आलेले आहेत. नगर जिल्ह्यात यु-डायसवर माहिती उपलब्ध असणारी ४३२ उच्च माध्यमिक विद्यालयांची संख्या असून या ठिकाणी ही ऑनलाईन प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

**अकरावीसाठी १ हजार ५७ तुकड्या मंजूर**

नगर जिल्ह्यात कला विभागाचे ३७४ वाणिज्य विभागाचे १६१ विज्ञान ४८४ संयुक्त २९, व्होकेशनल ९ असे एकूण १ हजार ५७ अकरावीचे तुकड्या मंजूर आहेत या ठिकाणी ९७ हजार ७० जागा उपलब्ध असल्याचे माध्यमिक शिक्षक विभागाकडून सांगण्यात आले.

**चार फेऱ्यांनंतर वर्ग सुरू**

दहावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर प्रवेश प्रक्रियेत नियमित चार फेऱ्या पूर्ण झाल्यानंतर अकरावीचे वर्ग सुरू करावेत, त्यानंतर उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर सर्वांसाठी खुले प्रवेश ठेवावेत. हे प्रवेश गुणवतेच्या आधारावर करावेत. याबाबतचे आदेश विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांना द्यावेत. अकरावीत प्रवेशित होणाऱ्या शेवटच्या विद्यार्थ्यांपर्यंत प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीनेच होईल, असे शासन आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

> ▸ शालेय शिक्षण विभागाच्यावतीने ठरवून दिलेल्या तरतूदीनूसार यंदा अकरावीची प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. दहावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर विहीत पध्दतीने ही प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. नगर जिल्ह्यात अकरावीसाठीच्या ९७ हजारांहून अधिक जागा उपलब्ध असून एकही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहणार नाहीत, यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत.
>
> **–अशोक कडूस,** शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग

## खरीप हंगामासाठी भरारीपथकाची स्थापना

खते आणि बियाणे उपलब्ध व्हावीत, यासाठी कृषी विभागाच्या वतीने नियोजन करण्यात आले आहे. तसेच खत आणि बियाण्यांचा काळाबाजार होऊ नये, यासाठी जिल्हा व तालुका पातळीवर भरारी पतके स्थापन करण्यात आली आहे.

जिल्हा पातळीवर असणाऱ्या भरारी पथकाचे कृषी विकास अधिकारी शिंदे हे प्रमुख आहेत. त्यांच्या नेतृत्साखाली समितीत उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर पी. बी. गोसावी, उपविभागीय अधिकारी संगमनेर व्ही. आर. गायकवाड, उपविभागीय अधिकारी डी. पी. डमाळे, उपविभागीय अधिकारी आर.बी. सुपेकर यांच्यासह जिल्हा मोहिम अधिकारी ए.बी. गांगर्डे, वजनमापे निरीक्षक के. ए. दराडे आणि जिल्हा गुण नियंत्रक आर. बी ढगे यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे. नेमण्यात आलेल्या या भरारी पथकाचे कामे निश्चित करण्यात आली असून त्यांनी हंगामाच्या निर्धारित वेळेत बियाणे व खते वितरक उत्पादक-विक्रेते केंद्रांना भेटी देऊन व्यापक स्वरूपात तपासणी मोहिम राबवावी. तसेच नियमबाह्य असणाऱ्या केंद्रांना विक्री बंदीचे आदेश काढावे. कालबाह्य बियाणे यांची तपासणी करून शेतकऱ्यांची फसवणूक होणार नाही या दृष्टीने कारवाई करावी.

तसेच शेतकऱ्यांना विक्री होणारे खते बियाणे याची विक्री केंद्रातील बिले शिल्लक साठा यातील तफावत असणाऱ्या केंद्रांवर कारवाई करावी. प्रत्येक बियाणे लॉटचा नमुना घेऊन त्याची तपासणी करावी, अप्रमाणीत बोगस अनधिकृत साठ्यांचा शोध घेऊन, त्यावर जप्तीशी कारवाई करावी. ज्या उत्पादक कंपनीचा पूर्व इतिहास खराब आहे, अशा कंपन्यांवर लक्ष ठेवावे. जादा दराने विक्री अथवा लिंकिंगद्वारे विक्री होणाऱ्या कृषी केंद्रावर डमी गिऱ्हाईक पाठवून तात्काळ कारवाई करावी, यासहअन्य सूचना देण्यात आल्या आहेत.

**फसवणूक करणाऱ्यावर होणार दाखल गुन्हे**

खरीप हंगामात बनावट, विनापरवाना अनधिकृत अधिसूचित नसलेले खते यांची विक्री करणाऱ्या कृषी केंद्रांवर थेट पोलिसात गुन्हा दाखल करण्याचे आदेश भरारी पथकांना देण्यात आलेले आहेत. तसेच कीटकनाशकांच्या लेबल वरील माहिती केंद्रीय कीटकनाशक मंडळ नोंदणी समितीने मंजूर केलेल्या कलमानूसार आहे की नाही याची तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.